# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, दिनांक २७ नोव्हेंबर, २०२२ रोजी होणा-या प्राचार्य मतदार संघाच्या अधिसभेवरील निवडणुकीसाठी ज्यांनी मतदार म्हणून नोंदणी केलेली आहे त्यापैकी खालील नमूद मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येणार नाही.

१. जे मतदार नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत आणि दिनांक २७ नोव्हेंबर, २०२२ रोजी प्राचार्य म्हणून सेवेत नाहीत.

२. ज्या मतदारांची कोणत्याही कारणामुळे सेवा संपुष्टात आली आहे आणि तो मतदार दिनांक २७ नोव्हेंबर, २०२२ रोजी प्राचार्य म्हणून सेवेत नाही.

३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६४ मधील तरतुदीनुसार एखादी व्यक्ती, पुढील कारणांवरुन कोणत्याही प्राधिकरणांची, मंडळांची व समितीची सदस्य होण्यास आणि प्राधिकरणे, मंडळे आणि समित्या यांना मतदान करण्यास निरर्ह ठरेल :-

क) ती व्यक्ती, विकल मनाची असेल व एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल; किंवा

ख) ती अमुक्त नादार असेल; किंवा

ग) ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल जी दोषी ठरली असेल; किंवा

घ) ती खाजगी शिकवण्या घेत असेल किंवा खाजगी शिकवणी वर्ग चालवत असेल; किंवा

ङ) कोणत्याही परीक्षा घेताना व मूल्यमापन करताना, कोणत्याही प्रकारे व कोठेही अनुचित व्यवहार केल्याबद्दल किंवा त्याला चालना दिल्याबद्दल जिला शिक्षा झालेली असेल; किंवा

च) तिने या अधिनियमाच्या, परिनियमांच्या किंवा आदेशांच्या तरतुदींचे पालन करण्याचे जाणीवपूर्वक टाळले असेल किंवा नकार दिला असेल किंवा विद्यापीठाच्या हिताकरिता हानिकारक असेल अशी कोणतीही कृती केली असेल; किंवा

छ) तिला गैरव्यवहार केल्याबद्दल सक्षम प्राधिका-याकडून कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली असेल; किंवा

ज) तिच्या पदीय दर्जामुळे, तिला परीक्षेसंबंधात आणि मूल्यमापनासंबंधात माहीत असलेली कोणतीही गोपनीय बाब, कोणत्याही रीतीने, ती लोकांसमोर उघड करील किंवा उघड करवील :

मतदार नसताना, मतदार असल्याचे भासवून मतदान करण्याचा प्रयत्न करणे हा दंडनीय अपराध आहे.

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे-४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/२०१
दिनांक : २४/११/२०२२

D:\Election 2022 (Bhosale)\Principal\Prakatan.docx